नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २५/०१/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

## अपघातात मृत्यू

**१) पो.स्टे. बोरी** :— अंतर्गत ५०० मी. अंतरावरील मौजा बुटीबोरी शिवार नागपुर वर्धा रोड येथे दिनांक २४/०१/२०२२ चे १८.४५ वा. ते १९.०० वा. दरम्यान अज्ञात वाहन चालक आरोपीने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एक अनोळखी इसम वय अंदाजे ३५ ते ४० वर्ष यास धडक दिली. या अपघातात त्याला डोक्याला, पायाला गंभीर स्वरूपाचा मार लागल्याने त्याचा मृत्यु झाला. तर आरोपी हा घटनास्थळावरूण पळुन गेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— प्रतीक हिरामनजी धार्मीक वय २९ वर्ष रा. प्रसाद कॉलनी वार्ड नं ०३ बुटीबोरी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादंवी. सहकलम १८४, १३४/१७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री व्येंकटेश दोनोडे हे करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील मौजा डुमरीकला शिवार रेलवे फाटक टर्निंग जवळ येथे दिनांक २०/०१/२०२२ चे २०:०० वा. दरम्यान आरोपी/मृतक नामे — स्वप्नील गुणवंता खोरगडे वय २४ वर्ष, रा. मसाळ ता.कामठी हा आपल्या ताब्यातील एमएच— ४०/सीएफ— २८६१ क्रमांकाच्या मोबरसायकलने भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन डुमरीकला शिवार रेल्वे फाटक टर्निंग वर त्याचया ताब्यातील मोटरसायकल स्लीप झाली. या अपघातात तो जखमी झाल्याने त्यास उपचाराकामी ग्रामीण रूग्णालय कामठी येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. मर्ग क्र ०४/२२ कलम १७४ जा.फौ चौकशी वरून मृतक स्वता अपघात होवुन स्वता मरण्यास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार फिरोज शेख यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादंवी. सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार फिरोज शेख मो क्र ९४२०२५३५०४ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत मौजा कढोली येथे दिनांक २४/०१/२०२२ चे १०:०० वा. दरम्यान सीजी– ०४/ डी. बी– ८१७१ क्रमांकाचा ट्रेलर एसचा चालक आरोपी नामे– मोहम्मद सज्जान मा. सुलेथान अंसारी, वय २५ वर्ष, रा. मोहम्मदपूरा खोजा, पो.स्टे. बबनटूरी जि. वैशाली बिहार याने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच– ३१/एजी– १८१५ क्रमांकाच्या ट्रॅक्टरला ओव्हरटेक करून पुढे जात असतांना टेलरच्या डाल्याच्या मागाचा भाग अंदाजे २० फुट घासत नेले. त्यामुळे ट्रॅक्टर ड्रायव्हर नामे– नरेंद्र तिरम सोनवाने, वय २५ वर्ष, रा. पिंडकेपार ता. साकोली जि. भंडारा हा गाडीतुन पडल्याने त्याला जबर मार लागला. त्यास उपचारकामी मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारादरम्यान त्याचा मृतयु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– भुपेंद्र गोपाल बारबुधे, वय २८ वर्ष, रा. आमगाव ता. साकोली भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादंवी. सहकलम १८४, १३४/१७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री अरविंद मोहोळ ९८२३९१०१५६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर